ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २५ पुणें, बुधवार तारीख ८ जुलै, १९५९ अंक २७

## विविध माहिती

**पृथ्वीच्या खोलींचें संशोधन**—अमेरिकन शास्त्रज्ञ पृथ्वीच्या पोटाचें संशोधन करण्यासाठी एक महत्त्वाकांक्षी योजना आखीत आहेत. ह्या योजनेंत पृथ्वीच्या गर्भांत खोल विहीर खणण्याचें ठरलें आहे. ही विहीर कित्येक-मैल खोल असेल. कोलंबिया विद्यापीठाला ह्या कामासाठीं नॅशनल सायन्स फौंडेशन कडून २०,००० डॉलर्सची देणगी मिळाली आहे. विहीर खणण्यासाठीं योग्य जागा लवकरच निवडण्यांत येईल.

**मुंबई राज्यांतील बंदरांचा विकास**—मुंबई सरकारनें राज्यांतील बंदरांचा विकास करण्याचा एक मोठा कार्यक्रम आंखला आहे. चालू वर्षांत मुंबईच्या दक्षिणेकडील बंदरांच्या विकासासाठीं ४० लाख रुपयांची रक्कम खर्च करण्यांत येणार आहे. कोकणांतील विजयदुर्ग आणि वेंगुर्ला ह्या बंदरांप्रमाणेंच गुजरातमधील कांहीं बंदरांचीहि सुधारणा करण्यांत येणार आहे.

**५७ च्या स्वातंत्र्ययुद्धावरील मार्क्सचे विचार**—रशिआच्या राजकीय वाङ्मय प्रकाशन शाखेनें कार्ल मार्क्स व एंजल्स ह्यांच्या १८५७ सालच्या भारतीय स्वातंत्र्ययुद्धावरील लेखांचा संग्रह छापून प्रसिद्ध केला आहे. शंभर वर्षांपूर्वी 'न्यूयॉर्क डेली ट्रायब्यूनल' ह्या पत्रांत मार्क्सनें लिहिलेले ह्या विषयावरील लेख ग्रंथांत एकत्रित करण्यांत आले आहेत.

**आसाममध्यें संशोधन-शाळा**— मध्यवर्ती सरकारनें आसामांत जोरहाट येथें एक संशोधन-शाळा स्थापन करण्याचें ठरविलें आहे. आसाममध्यें सांपडणाऱ्या औद्योगिक कच्च्या मालाचें संशोधन करण्याचें कार्य संस्था करील. त्याचप्रमाणें नवीन उद्योगधंद्यांच्या स्थापनेबाबतहि संशोधन करील. आसाममधील कच्च्या मालाची नीट पहाणीहि झालेली नाहीं.

**हरद्वारला यात्रेकरूंची गर्दी**—हरद्वार येथें सध्यां यात्रेकरूंची अफाट गर्दी उसळली आहे. रेल्वेनें अगर मोटारीनें दररोज २५ ते ३० हजार यात्रेकरू शहरांत येत आहेत. त्यामुळें शहरांतील १०० च्यावर असलेल्या सर्व धर्मशाळा भरून गेल्या आहेत. हजारों लोकांना गंगेच्या कालव्याच्या काठीं पथाऱ्या टाकून झोंपावें लागत आहे.

**तेलावर चालणारीं रेल्वेचीं एंजिनें**—क्रप्स ह्या प्रसिद्ध जर्मन कारखान्याच्या डायरेक्टरनें मुंबई येथें असें सांगितलें कीं, रुरकेला येथील पोलादाच्या कारखान्याच्या उभारणींत जर्मनीनें दिलेलें सहकार्य हें उभयतांच्या औद्योगिक संबंधांतील पहिलें पाऊल आहे. तेलावर चालणारीं रेल्वे एंजिनें तयार करण्याचा कारखाना काढण्याबाबत क्रप्सची भारत सरकारशीं बोलणीं चालू आहेत.

**गुजरात विद्यापीठाला तूट**—गुजरात विद्यापीठाच्या १९५९-६० सालच्या अंदाजपत्रकांत ४,३०,७७८ रुपयांची तूट दाखविण्यांत आली आहे. उत्पन्नाच्या बाजूकडे ३३,७८,८५२ रुपयांची रक्कम दाखविण्यांत आली असून खर्चाच्या बाजूकडे ३८,०६,६३०रु. चा आंकडा दाखविण्यांत आला आहे. बजेट सेनेटपुढें सादर करण्यांत आलें आहे.

**मध्यप्रदेशांतील शिक्षणप्रसार**—मध्यप्रदेशांत शिक्षणाचा प्रसार झपाट्यानें होत असल्यामुळें अधिकाधिक शिक्षकांची गरज उत्पन्न होत आहे. राज्य-सरकारनें ही गरज भागविण्यासाठी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंत ४,६०० मॅट्रिक शिक्षकांना व्यावसायिक शिक्षण देण्याचें ठरविलें आहे. शिक्षकांना शिकविण्यासाठीं तीन ट्रेनिंग स्कूल्स काढण्यांत येणार आहेत.

**समुद्रापासून खनिजांची प्राप्ति ?**—दक्षिण आफ्रिकेंतील एका शास्त्रज्ञानें समुद्राच्या पाण्यापासून युरेनिअम, अल्युमिनम, सोनें व तांबें हे धातू मिळविण्याची पद्धत शोधून काढल्याचा दावा केला आहे. ह्या पद्धतीनें अल्युमिनम सर्वांत अधिक प्रमाणांत उपलब्ध होईल असें त्याचें म्हणणें आहे. एका अमेरिकन कंपनीनें त्याच्या शोधाची मक्तेदारी घेतली आहे.

**निसर्गोपचार संस्थेला मदत**—हैदराबाद येथील निसर्गोपचार इस्पितळाला मध्यवर्ती सरकारनें १०,००० रुपयांची देणगी दिली आहे. ह्या देणगीचा उपयोग करून इस्पितळांत एक रोगनिदान संशोधनशाळा स्थापन करण्यांत येणार आहे. विशेषतः मधुमेह ह्या रोगासंबंधी संशोधन करण्यांत येणार आहे. मध्यवर्ती सरकारकडून मदत मिळालेली ही पहिलीच निसर्गोपचार संस्था असावी.

**झेक प्रदर्शनांत भारताचा भाग**—झेकोस्लोव्हाकिआंतील ब्रूनो ह्या शहरीं सप्टेंबरमध्यें भरणाऱ्या औद्योगिक प्रदर्शनांत भाग घ्यावयाचा निर्णय भारत सरकारनें घेतला आहे. भारतांत तयार होणाऱ्या मालाची प्रसिद्धि प्रदर्शनांत करण्यांत येईल. एंजिनिअरिंगचीं साधनें, खनिज उद्योगधंदे, कच्चा माल, इत्यादींच्या दृष्टीनें प्रदर्शन महत्त्वाचें आहे

**किंमती स्थिर राखण्याचें महत्त्व**—प्रे. आयसेनहोअर ह्यांनीं अमेरिकेंतील उद्योगवृद्धीसाठीं किंमती स्थिर राखण्यासंबंधी एक सरकारी कमिटी नेमली होती. सदर कमिटीनें आपल्या अहवालांत असें म्हटलें आहे कीं, किंमती स्थिर राखण्याच्या कामीं अपयश आलें तर अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या विकासाला मोठा धोका उत्पन्न होईल.

## कंपनी कायदा दुरुस्ती

### जिल्हा न्यायाधिशावर अविश्वास नको

(लेखक :—नारायण विनायक भोंडे, वकील पुणें.)

"A minimum standard of good behaviour and business honesty in company promotion and management,...a recognition of the rights of share-holders to receive reasonable information and facilities for exercising an intelligent judgment with reference to management, a provision for investigation into the affairs of any company managed in a manner prejudicial to the interests of the company as a whole or oppressive to a minority of the share-holders....a speedy and effective machinery for liquidation of companies...these are among the objectives of the new legislation."

—विश्वनाथशास्त्री-कंपनी दुरुस्ती कमिटीचा रिपोर्ट, पान ३.

१९५६ चे कंपनी कायद्यांत दुरुस्ती करणारे २१० कलमी विधेयक लोकसभेंत प्रविष्ट करण्यांत आलें असून तें सिलेक्ट कमिटीकडे पाठविणेची तयारी सरकारनें दर्शविली आहे. कंपन्यांना राजकीय पक्षास देणगी देण्यास कोणतीहि हरकत ठेवली नाहीं व कंपनीविरुद्ध तक्रारी आल्यास कंपन्यांच्या हिशेबाच्या वह्या मागण्याचा व तपासण्याचा हक्क रजिस्ट्रार यांस या नवीन दुरुस्तीनें मिळणार आहे. कंपनी कायद्याखालील खटले सांप्रत राज्यसरकारचे पब्लिक प्रॉसिक्यूटर चालवितात. परंतु कामाचा उठाव लवकर व्हावा म्हणून कंपनी कायदाविषयक विभागातर्फे पब्लिक प्रॉसिक्यूटरची नेमणूक नवीन अमदानींत सुरू करण्याचा सरकारचा इरादा आहे. माहिती व हिशोबाचे तक्ते रजिस्ट्रारकडे पाठविण्यास विलंब झाला तर कंपन्यांचे पदाधिकाऱ्यांविरुद्ध या तांत्रिक दोषांबद्दल खटला भरता येतो, पण अशा उशिराची संवय लागली नसल्यास केवळ दंड भरून सुटका व माफी आतां कंपनी मिळवूं शकेल. संचालक, पदाधिकारी यांचे नातेवाइकांबाबत पुष्कळच निषेध विद्यमान कायद्यांत आहेत. नातेवाइकांची संख्या दोनशेपर्यंत पोहोंचूं शकते, परंतु नवीन योजनेंत ती संख्या ५९ वर आणली आहे. निवडणुकीस उभे रहाणाऱ्या इसमास खर्चाच्या हिशोबाचे तक्ते भरण्याचें बंधन सांप्रत आहे तें शिथिल करून यशस्वी उमेदवारांनींच फक्त ते पाठवले तरी भागेल अशी सवलत नवीन विधेयक देऊं इच्छिते.

### जिल्हा न्यायालयें नालायक कां ?

कंपन्यांची घटना, मॅनेजिंग एजन्सीचा अधिकारसंकोच, वगैरे दुरुस्तीसंबंधीं तूर्त या लेखांत कांहीं मतप्रदर्शन करण्यांत येत नाहीं. पण उभ्या भारताचे कित्येक जिल्हा न्यायासनास जी हुकमत व जो अधिकार १९१३ चे कंपनी कायद्यान्वयें मध्यवर्ती सरकारला देतां येत होती व त्यांनीं दिली होती ती १९५६ चे कायद्यानें काढून घेतली व डिस्ट्रिक्ट कोर्टांत तीं कामें चालविण्यास नालायक केलीं. तरी हीं हुकमत व हा अधिकार देण्याची सवलत नवीन योजनेंत ठेवणें आवश्यक आहे.

सन १९१३ चें इंडियन कंपनीज ॲक्टाचें कलम ३ (१) अन्वयें मध्यवर्ती सरकारास वाटतील त्या अटी व मर्यादा घालून कोणत्याहि जिल्हा न्यायासनास कंपनी कायद्याखाली पडणाऱ्या कोणत्याहि बाबींचा निर्णय करण्याचा अधिकार व हुकमत देतां येत असे, व त्याप्रमाणें मध्यवर्ती सरकारनें अहमदाबाद, भडोच, खेडा, पुणें, सातारा, सोलापूर, सुरत या मुंबई राज्यांतील जिल्हा न्यायाधिशास हे अधिकार सुपूर्त केले होते. मध्यप्रदेशांतील सर्व जिल्हा न्यायाधीश व मद्रास राज्यांतील कांहीं मर्यादा ठेवून सर्व जिल्हा कोर्टें यांना ही हुकमत मध्यवर्ती सरकारनें दिली होती. परंतु १९५६ च्या कंपनी कायद्याच्या १० व्या कलमान्वयें मध्यवर्ती सरकारचा व म्हणून जिल्हान्यायाधिशाचा हा अधिकार अजिबातच नष्ट केला आहे.

### विकेंद्रीकरण

या अधिकारविच्छेदनाचा सरळ व उघडउघडी परिणाम झाला तो असा कीं एक लाख रुपये व त्यापेक्षा अधिक भांडवल असलेल्या कंपन्याबाबत नादारीचीं कामें, तसेंच कंपनीच्या कामकाजाची चौकशी (कलम २३७), सावकार व सभासद यांचेबरोबरची तडजोड अगर व्यवस्था (कलम ३९१), सावकार व सभासद यांच्या तडजोडीसंबंधाची माहिती देण्याची तरतूद (कलम ३९३), असंतुष्ट व विरोधी भागीदारांचे भाग विकत घेण्याची सत्ता व कर्तव्य (कलम ३९५) व कंपन्यांचे बाबतींत पिळवणूक व अव्यवस्था (क. ३९७ ते ४०७) या कोणत्याहि बाबींसंबंधी अर्ज स्वीकारण्याचा व चालविण्याचा अधिकार कायद्यानें भारतांत कोणाहि व कोणत्याहि जिल्हान्यायाधिशास देतां येत नाहीं.

जिल्हा न्यायकोर्टाची आमूलाग्र हुकमत काढून घेतल्याचा परिणाम असा झाला आहे कीं, या विशिष्ट व निषिद्ध क्षेत्रांतील कामें जीं १७ कोर्टांतून विभागली जात ती राज्यसरकारच्या राजधानींत असलेल्या हायकोर्टाकडे केंद्रित होतील. नादारी, भागीदार व सावकाराबरोबरच्या तडजोडी, कंपन्यांचा गैरकारभार वगैरे प्रश्न व प्रकरणें उद्भवल्यास कंपन्यांचे संचालक, भागीदार, वगैरेसंबंधीं पक्षकारास आपले कागदपत्र, साक्षीदार घेऊन दूरवर्ती स्थळीं जावें लागणार व त्याचा वेळ, उत्साह व भलताच पैसा खर्ची पडणार. जिल्हा वकील व न्यायाधीश यांना या कामाचा अभ्यास करण्यास संधि नाहीं व स्थानिक मंडळीस मोबदला मिळण्यास वाव नाहीं. खेडेगांवांतून शहरांत व जिल्हा ठिकाणापासून राजधानींत जाणाऱ्या प्रवाहास प्रतिबंध असावा, व स्थानिक बुद्धिमत्ता व तडजोड यांस उत्तेजन असें सरकारचें धोरण आहे. परंतु सन १९५६ च्या कायद्यानें चाळीस वर्षे चालत आलेल्या वहिवाटीस मूठमाति देऊन दीर्घकाळपर्यंत जिल्हा न्यायासनांनीं उपयोगांत आणलेले व वापरलेले अधिकार त्याजपासून कायद्यानें काढून घेण्यांत आले आहेत.

### न्याय सुलभ, स्वस्त करा

प्रथम उच्च न्यायालयाकडे काम सोंपवून तें खालील न्यायाधिशाकडून करून घेण्याचा प्रघात स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळांत चालू आहे. प्रोबेट व लेटर्स ऑफ ॲडमिनिस्ट्रेशनचीं कामें पूर्वी जिल्हा न्यायालयें करीत व खालील न्यायालयावर सोंपवलीं जातात. मुंबई राज्यांतील विवाहविच्छेदनाचे दावे जिल्हा कोर्टांत दाखल केले तरी सिव्हिल जज्जाकडे सुपूर्द करण्यांत येतात. जिल्हा ठिकाणचे बी. ए. डी. आर. ॲक्टाखालील अर्ज हे प्रथमश्रेणींतील न्यायाधिशासच चालविण्याचा पूर्वी हक्क होता, तो नंतर द्वितीय श्रेणीकडेहि वर्ग करण्यांत आला, व स्मॉलकाज न्यायाधिशानें वस्तुतः चौकशी करण्याचे भाडेनियंत्रण कायद्याखालील अर्ज अथवा दावे प्रथम व द्वितीय अर्जाच्या न्यायाधिशाकडे पाठवले जातात. हेतु असा कीं कार्यक्षमतेस बाध न येतां पक्षकारास त्वरित व थोडक्या खर्चांत न्याय व निकाल मिळावा. परंतु कंपनी कायद्याचें या निष्ठुर व विलक्षण तरतुदीच्या योगानें हा उद्देश अंशतः पण राजरोस व बुद्धिपुरःसर विफल केला आहे व विकेंद्रिकरणाऐवजीं केंद्रिकरण झालें आहे. तरी नवीन विधेयकानें चाळीस वर्षे अमलांत असलेली सोय व सवलत जिल्हा न्यायालयास हुकमत देण्याचा अधिकार, ही पूर्ववत सुरू करावी आणि जनतेस सुलभ, सोपा व सवलतीनें न्याय मिळण्याचे कामीं मदत करावी.

# अर्थ

बुधवार, ता. ८ जुलै, १९५९



संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे

## बँकिंग कंपन्यांच्या कायद्यांतील कलमांची अंमलबजावणी

बँकिंग कंपन्यांच्या कायद्याखालील वेगवेगळ्या कलमांचे संबंधांतील बँकांची परिस्थिति खाली दिग्दर्शित केली आहे. त्यावरून, रिझर्व्ह बँकेचें सहानुभूतीचें धोरण स्पष्ट होईल. कांहीं कलमांतील तरतुदींचें उल्लंघन बँकांचे हातून झालें व होत राहिलें, त्यास त्यांचा गतइतिहास कारणीभूत होता; पण कांहीं कलमांचा भंग बँका योग्य दक्षतेनें टाळूं शकल्या असत्या, असें दिसून येईल. १९५८ अखेर फक्त ६० बँकाच लायसेन्सला लायक आढळून आल्या; १२८ बँकांना लायसेन्स नाकारण्यांत आला आणि ३२३ बँकांच्या लायसेन्सच्या अर्जांचा अजून निकाल लागलेला नाहीं, ह्यावरून हिंदी बँकिंगच्या परिस्थितीची कल्पना येईल. एकूण ठेवींपैकीं ९[illegible]% रक्कम लायसेन्स असलेल्या बँकांकडेच आहे, हें लक्षांत घेऊनच रिझर्व्ह बँक इतर बँकांच्या बाबतींत सवलती देत असली पाहिजे हें उघड आहे.

### कलम ७ ('बँक,' 'बँकर,' 'बँकिंग')

१९५७ अखेर ३२ बँकांनीं ह्या कलमाचा भंग केला. त्यांपैकीं एकीनें स्वतःचें बिगर-बँकिंग कंपनींत रूपांतर केलें आणि दुसरीला २२ व्या कलमाखाली लायसेन्स नाकारण्यांत आला. बाकीच्या बँका प्रस्तुत कलमांत येण्याची उपाययोजना करीत आहेत.

### कलम ९ (बिगर-बँकिंग जिंदगीची विल्हेवाट)

१९५७ मध्यें ३८ बँकांनीं ह्या कलमाचा भंग केला; त्यांत १९५८ मध्यें आणखी १४ बँकांची भर पडली. अशा ५२ बँकांपैकीं तीन बँकांनीं आपली परिस्थिति दुरुस्त केली; उरलेल्या ४९ बँकांना दुरुस्तीसाठी व कलमाच्या तरतुदींत येण्यासाठी मुदत वाढवून देण्यांत आली.

### कलम १० (मॅनेजिंग एजंटस नेमण्यास प्रतिबंध आणि विशिष्ट नेमणुकांवर नियंत्रण)

गेल्या वर्षअखेर २५ बँकांनीं कलम १० (१) (क) (i) आणि / अथवा १० (१) (क) (ii) ह्याचें उल्लंघन केलें होतें, त्यांत दोन बँकांची भर पडली. तीन बँकांनीं १० (१) (क) (i) च्या तरतुदी आपल्या बँकेस लागू होऊं नयेत असा अर्ज केला आणि आपल्या प्रमुख अधिकाऱ्याला इतर कंपन्यांशीं संबंध ठेवण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली. एका बँकेनें तांत्रिक कारणासाठी १० (१) (क) (ii) मधून मुक्तता मागितली. ह्या ३१ बँकांपैकीं तीन बँकांनीं कलमाच्या तरतुदी पुऱ्या केल्या, दोन व्हॉलंटरी लिक्विडेशनमध्यें गेल्या आणि चार बँकांना तरतुदींच्या अंमलबजावणींतून मुक्त करण्यांत आलें. उरलेल्या २२ बँका तरतुदींत येण्यासाठी योजना करीत आहेत.

### कलम ११ (किमान वसूल भांडवल व रिझर्व्हज)

१९५८ मध्यें, वरील कलमाप्रमाणें भांडवल उभारण्यासाठी ८ बँकांचे अर्ज कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूजनें रिझर्व्ह बँकेकडे शिफारशीसाठी पाठविले. म्हणजे, अशा अर्जांची आजवरची संख्या २१४ झाली. त्यांपैकीं सहा अर्जांची शिफारस करून एक अर्ज नाकारावा असें सुचविण्यांत आलें. उरलेल्या एका अर्जाचा विचार वर्षअखेर चालू होता.

वसूल भांडवल व रिझर्व्ह जरूरीपेक्षा कमी असलेल्या २८ बँकांना ३१ मार्च, १९५८ पर्यंत माफी देण्यांत आली. त्यांपैकीं तीन बँकांनीं जरूर ती योजना केली, एका बँकेला माफीची मुदत वाढवून दिली नाहीं आणि एकीनें व्यवहारच बंद केला. एका बँकेनें आधीं जरूरीप्रमाणें भांडवल–रिझर्व्ह वाढवलें, पण आंध्र राज्यांतील जिल्ह्यांच्या पुनर्घटनेमुळें ती पुनः कलमाचा भंग करणारी ठरली; तिला ऑक्टोबर, १९५९ अखेर मुदत वाढवून दिली. बाकीच्या २२ बँकांना मार्च, १९५९ अखेर मुदत देण्यांत आली. ह्या २२ बँकांपैकीं तीन बँका जरूर ती वाढ करूं शकल्या आणि एक दुसरींत विलीन झाली.

### कलम १२ (वसूल भांडवल, खपलेलें भांडवल)

ह्या कलमाचा भंग चालू ठेवणाऱ्या अद्याप १२ बँका आहेत.

### कलम १५ (डिव्हिडंड वाटण्यावर बंधन)

'कॅपिटलाइज' केलेला खर्च पूर्णपणें लिहून टाकण्यापूर्वींच डिव्हिडंड वाटणाऱ्या ११ बँका निघाल्या. ह्यापुढें असें न करण्याचें त्यांनीं मान्य केलें आहे.

### कलम १६ ('कॉमन डायरेक्टर्स'ना प्रतिबंध)

बँकांच्या बोर्डावर 'कॉमन डायरेक्टर्स' असण्यास प्रतिबंध असतांहि ७ बँकांनीं हें कलम मोडलें; त्या आतां दुरुस्तीची व्यवस्था करीत आहेत.

### कलम १७ (रिझर्व्ह फंडाकडे नफा वर्ग)

निव्वळ नफ्याचा २०% भाग रिझर्व्ह फंडाकडे वर्ग केला पाहिजे, ह्या तरतुदीचा नऊ बँकांनीं भंग केला. चालू व येत्या वर्षींच्या नफ्यांतून रिझर्व्ह फंड भरून काढण्याचें त्यांनीं मान्य केलें आहे.

### कलम १८ (किमान कॅश रिझर्व्ह राखणें)

किमान टक्केवारी न राखणाऱ्या बँका अत्यंत थोड्या होत्या व तो भंगहि तात्कालिक होता; त्याची दुरुस्तीहि तात्काळ होत गेली.

### कलम १९ (सबसिडिअरी कंपन्यांचें स्वरूप)

कंपन्यांचे भाग धारण करण्याबाबत बँकांवर कलम १९ (२) नें घातलेल्या बंधनांची तीन बँकांना माफी केलेली होती; त्यांपैकीं एकीनें परिस्थिति सुधारली आणि बाकीच्या दोन बँकांच्या माफीची मुदत वाढविण्यांत आली. १९५८ मध्यें आणखी पांच बँकांनीं १९ व्या कलमाचा भंग केला; पण चारांनीं सुधारणा केली.

### कलम २० (कर्जावर निर्बंध)

कलम २० (i) चा भंग करणाऱ्या १० बँकांपैकीं दोन बँकांनीं कलमाच्या तरतुदी पाळण्याइतपत सुधारणा घडवून आणली.

### कलम २२ (बँकिंग कंपन्यांना लायसेन्स)

१९५८ मध्यें सहा हिंदी शेड्यूल्ड बँकांना व तीन बिगर-शेड्यूल्ड बँकांना लायसेन्स देण्यांत आलीं. म्हणजे, आतांपर्यंत एकूण ६० बँकांना लायसेन्स देण्यांत आलीं आहे. लायसेन्स मिळालेल्या शेड्यूल्ड बँका व चार स्टेट असोसिएटेड बँका ह्यांचेकडे मिळून सर्व बँकांकडील ठेवींच्या ९३% ठेवी आहेत.

२१ बिगर शेड्यूल्ड बँकांना लायसेन्स नाकारण्यांत आला; कारण त्यांचा कारभार ठेवीदारांच्या हितास बाधक होईल अशा प्रकारें चालू होता. अशा रीतीनें, आजवर १२८ अशा बँकांना लायसेन्स नाकारण्यांत आला आहे. ३२३ बँकांचे अर्ज अजून पडून आहेत. लायसेन्ससाठी पात्र होण्याकरितां दोष दुरुस्त करण्याचे कामीं बँका उपाययोजना करीत नाहींत, त्यामुळें लायसेन्स देण्याचे बाबतींत प्रगति मंद आहे.

### कलम २९ व ३० (हिशेब व ताळेबंद)

१९५८ मध्यें १० बँकांनीं वरील कलमांतील तरतुदींचा भंग केला, त्याकडे बँकांचें लक्ष वेधण्यांत आलें व पुनः भंग न करण्याविषयीं त्यांना ताकीद देण्यांत आली.

### कलम ३१ (रिटर्न्स पाठविण्याबाबत)

ताळेबंद व नफा-तोटापत्रकें पाठविण्यासाठीं कित्येक बँकांना वरील कलमाखालीं तीन महिनेपर्यंत मुदत वाढवून दिली. ज्या कांहीं लहान बँकांना प्रसिद्धीचा खर्च झेपण्याजोगा नव्हता, त्यांना वरील कलमाची माफी देण्यांत आली.

### कलम ३५ (ब) (मुख्य कार्यवाहाची नेमणूक)

चीफ एक्झिक्यूटिव्ह ऑफिसरच्या नेमणुकीच्या मंजुरीसाठी आलेल्या २५५ अर्जांपैकीं २४९ मंजूर केले व ६ नामंजूर केले.

---

**खिन्नता घालविणारें औषध**—अमेरिकेंतील एका डॉक्टरानें मानसिक खिन्नतेवर अत्यंत गुणकारी असें औषध शोधून काढल्याचा दावा केला आहे. त्यानें आपल्या १८० मानसिक रोग्यांना वरील औषध देऊन पाहिलें. त्यांपैकीं १४४ रोग्यांच्या मानसिक अवस्थेंत ६ आठवड्यांत अनुकूल फरक पडला. नंतर त्यांना ह्या आजाराचे झटकेहि आले नाहींत.

**युगोस्लाव्हिआंतील चित्रपट महोत्सव**—युगोस्लाव्हिआंतील बोलपटांची प्रगति अजमावण्यासाठी बेलग्रेड येथें एक चित्रपट महोत्सव भरविण्यांत येणार आहे. ह्या उत्सवांत, भारतांत तयार झालेले दोन अनुबोधपट दाखविण्यांत येणार आहेत. इतर अनेक देशांतील अनुबोधपटहि दाखविले जातील. उत्सवांत स्पर्धा ठेवण्याचा हेतु नाहीं.

**ब्रिटनची पुस्तकांची निर्यात**—१९५८ सालीं ब्रिटननें भारताला इंग्रजी भाषेंतील ४,२४,४२७ पौंड किंमतीच्या पुस्तकांची निर्यात केली. त्याशिवाय पाकिस्तान, सीलोन व इस्रायल ह्या देशांनाहि पुस्तकें निर्यात करण्यांत आलीं. पाकिस्ताननें ३९,९५० पौंड किंमतीचीं पुस्तकें आयात केलीं.

**मुंबईच्या आसपासच्या मिठागरांचें नुकसान**—मुंबईच्या आसपासच्या भागांतील मिठागरांचें उत्पादन बरेंच घटलें आहे. गेल्या महिन्याच्या २२ तारखेस समुद्रावर वादळ झालें व मिठागरानजीकच्या समुद्राला भरतीहि फार मोठी आली. त्यामुळें मिठागराच्या धंद्यांची बरीच पडझड झाली आणि तयार मिठाचे सांठे समुद्रांत वाहून गेले. नुकसानीचा आंकडा कित्येक लाखांवर जाईल.

### तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठीं लागणारा पैसा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआचे मुख्य सल्लागार डॉ. बी. के. मदन ह्यांनीं मुंबई रोटरी क्लबपुढें बोलतांना असे विचार व्यक्त केले कीं तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी लागणारा पैसा देशांतच उभा करावयाचा असेल तर समाजाच्या सर्व थरांतील लोकांनीं अधिक प्रमाणांत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर सोसण्याची तयारी दाखविली पाहिजे. ते म्हणाले कीं लोकांनीं अधिक बचत करण्याची म्हणजेच अधिक साधें जीवन जगण्याची तयारी केली पाहिजे. सध्यां शेतीच्या विभागावर घेण्यांत येणारा कर फारच अल्प आहे. ह्या करांत बरीच वाढ करण्याचा मार्ग शोधून काढल्याशिवाय कार्यक्रमाला लागणारा पैसा उभा करणें शक्य होणार नाहीं. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस खाजगी मालकीच्या विभागांत ३,००० कोटी रुपयांचें भांडवल गुंतविलें जाईल असा अंदाज आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत खाजगी मालकीच्या विभागांत ४,००० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचें उद्दिष्ट ठेवण्यांत आलें आहे. हें उद्दिष्ट गांठणें शक्यतेच्या कोटींत आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला १०,००० कोटी रुपये लागणार आहेत. त्यांपैकीं २,५०० कोटी रुपये परदेशांकडून आणावे लागतील. ह्यापैकीं ५०० कोटी रुपये दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत घेतलेल्या कर्जाच्या व त्यावरील व्याजाच्या फेडीसाठी द्यावे लागतील. भारताची अर्थव्यवस्था आपोआप विकास पावत जाण्यायोग्य करण्यासाठी बाहेरची मदत बराच दीर्घ काळपर्यंत घ्यावी लागणार आहे. हा काळ कमींत कमी करण्याची इच्छा असली तर परदेशांकडून फार मोठ्या प्रमाणावर मदत घेण्याची तयारी दाखविली पाहिजे.

### कापडाच्या धंद्यांत कम्युनिस्ट राष्ट्रांची स्पर्धा

इंडिअन कौन्सिल ऑफ फॉरिन ट्रेड ह्या संघटनेच्या मध्यवर्ती कमिटीच्या तिमाही सभेंत बोलतांना कौन्सिलचे अध्यक्ष श्री. मुरारजी वैद्य ह्यांनीं कापडाच्या धंद्यांत कम्युनिस्ट राष्ट्रगटाकडून होणाऱ्या जबर स्पर्धेचा उल्लेख केला. ते म्हणाले कीं, भारत आणि पश्चिम युरोपांतील राष्ट्रें ह्यांच्या कापडाच्या धंदाला कम्युनिस्ट देशांकडून होणाऱ्या कापडाच्या निर्यातीमुळें धोका उत्पन्न झाला आहे. जागतिक बाजारपेठेंत ह्या राष्ट्रांनीं स्वस्त किंमतीचें कापड उतरविण्याचा धडाका चालविला आहे. ह्या स्पर्धेला तोंड देण्यासाठी कापडाच्या धंद्यांतील पुढाऱ्यांनीं व सरकारनें उपाययोजना केली पाहिजे. बाजारपेठेंत जोराची स्पर्धा करण्याच्या कम्युनिस्ट देशांच्या धोरणामागें अनेक हेतू आहेत. कापडाची निर्यात करून त्यांना परदेशीय हुंडणावळ तर मिळवावयाची असतेच; पण, त्याशिवाय लष्करी आणि राजकीय कारणांसाठीहि ते स्पर्धेचा अवलंब करीत आहेत. जगाच्या बाजारपेठांतून आपली श्रेष्ठता दाखविण्याची त्यांची ही एक रीत आहे. पाश्चात्य देशांतील कापडाच्या धंद्यांतील प्रगतीशीं व एकंदर परिस्थितीशीं संबंध ठेवणेंहि त्यांना स्पर्धेमुळें शक्य होतें. अलीकडे भारताच्या कापडाच्या निर्यातींत घट झालेली दिसते. पण, त्याबद्दल व कापडाच्या धंद्याच्या सध्यांच्या परिस्थितीबद्दल सरकारच्या धोरणालाच जबाबदार धरलें पाहिजे. ह्या बिकट परिस्थितींतून बाहेर पडावयाचें असेल तर एकच मार्ग आहे. ज्या लहान गिरण्या आर्थिकदृष्ट्या न परवडणाऱ्या असतील त्यांचें एकत्रीकरण करण्यांत आलें पाहिजे आणि जुन्या गिरण्यांत आधुनिक तऱ्हेची यंत्रसामुग्री बसविण्याची परवानगी देण्यांत आली पाहिजे. रशिआ व चीनसारख्या कम्युनिस्ट देशांनीं कापडाच्या बाजारांत उतरून तीव्र स्पर्धा केली आहे, तिला तोंड देण्याचा दुसरा मार्ग नाहीं.

# श्रीमहालक्ष्मी को. बँक लि., कोल्हापूर

## रौप्य-महोत्सव वृत्तांत

[ श्रीमहालक्ष्मी को. बँक लि., कोल्हापूरचा, रौप्यमहोत्सव सहकारमंत्री ना. बाळासाहेब भारदे ह्यांच्या अध्यक्षतेखाली थाटानें पार पाडला. महोत्सवाचें निमित्त संस्थेचा पंचवीस वर्षांचा वृत्तांत प्रसिद्ध करण्यांत आला आहे, तो अत्यंत व्यवस्थित, औचित्यपूर्ण आणि संस्थेबद्दल आदर निर्माण करणारा असा आहे, हें मुद्दाम नमूद करावेंसें वाटतें.

संस्थेच्या कार्याचें पुढारीपण व जबाबदारी प्रामुख्यानें अध्यक्षावर असतें. त्याचप्रमाणें, प्रत्यक्षांत काम करणाऱ्या ऑनररी सेक्रेटरी व मॅनेजर यांचेवरहि. या सर्वांची सविस्तर व वैशिष्ट्यपूर्ण ओळख वृत्तांताचे अखेरच्या प्रकरणांत करून देण्यांत औचित्य साधलें आहे. वृत्तांताची भाषा समतोल, पण आकर्षक आहे.

वृत्तांताच्या पुस्तिकेंत प्रारंभीं रौप्यमहोत्सवसमितीचे कार्याध्यक्ष व बँकेचे अध्यक्ष श्री. दा. श्री. मुनीश्वर, बी. ए., बी. टी. ह्यांनीं थोडक्यांत विज्ञापना केली आहे. ]

### अध्यक्ष, श्री. मुनीश्वर ह्यांची विज्ञापना

"श्रीमहालक्ष्मी को-ऑप. बँक लि. या संस्थेची प्रतिष्ठापना सन १९३३ सालीं होऊन गतवर्षींच या संस्थेला २५ वर्षे पूर्ण झालीं. संस्थेच्या स्थापनेपासून पहिलीं नऊ वर्षे म्हणजे सन १९४२ पर्यंत संस्थेचें सर्वसाधारण स्वरूप अगदीं बाल्यावस्थेंतील होतें. संस्थेच्या वैशिष्ट्यपूर्ण भरीव कार्याची सुरुवात सन १९४२ पासूनच झाली. कारण त्या वर्षी संस्थेनें बँकिंगचे सर्व व्यवहार सुरू करून प्रथमतः पतपेढी असलेल्या या संस्थेचें रूपांतर को-ऑप. बँकेंत केलें.

"संस्थापक व संचालक मंडळावरील सदस्यांनीं सुरुवातीपासून या संस्थेच्या कामकाजास योग्य असें वळण लावून निस्पृहपणा, नियमांचें काटेकोर पालन व प्रसंगीं कटुता पत्करूनहि संस्थेच्या अंतिम हिताकडे दृष्टि ठेवणें, हे हा संस्थेचे स्थायीभाव बनविण्यास मदत केली, आणि यांतूनच संचालक मंडळावरील सदस्यांनीं संस्थेंतून कसलेंहि कर्ज व जामिनगत पत्करावयाची नाहीं अशी लिखित प्रथा निर्माण झाली, आणि त्या प्रथेचें यथायोग्य पालन आजपावेतों होत आहे. म्हणूनच बँकेचें आर्थिक व्यवहार अत्यंत निरपेक्ष वृत्तीचे व सुरक्षिततेचे होत आले आहेत.

"नियमांच्या व्यवस्थित पालनामुळेंच बँकेच्या उत्कर्षाचें श्रेय जसे संचालक मंडळावरील सदस्यांकडे जातें, तसेंच तें सर्वसाधारण सभेंतील जागरूक तज्ज्ञ मित्रांकडेहि जाते. बँकेच्या उत्कर्षाला त्या सर्वांनीं यथायोग्य हातभार लावला आहे, हें नमूद करणें युक्तच होईल. आपली संस्था बहुंशानें मध्यमवर्गीयांची असल्यानें संस्थेच्या कार्याकडे चिकित्सक व सखोल अभ्यासू दृष्टीनें पाहणाऱ्या सभासदांची वाण कधींच पडली नाहीं. वार्षिक अहवालांतील कानामात्रेकडे देखील ज्यांची विचक्षणीय दृष्टि पोहोंचूं शकते, ते सदस्य संस्थेच्या जमाखर्चविषयक वा इतर तांत्रिक बाबींकडे कानाडोळा करतील, हें कदापि शक्यच नाहीं; आणि या त्यांच्या जागरूकतेमुळेंच संस्थेची उत्तरोत्तर प्रगति होत आली आहे.

"अशा तऱ्हेनें संस्थेला चिरस्थायी स्वरूप प्राप्त होत असतांना एकाच गोष्टीची वारंवार उणीव भासते, आणि ती म्हणजे संस्थेच्या मालकीची सुसज्ज व बँकिंगच्या सर्व व्यवहारांस उपयुक्त अशी नवी इमारत ही होय. संस्थेच्या मालकीचा ताराबाई रोडवर खुला ब्लॉक असून हल्लीं ज्या जागेंत बँक आहे, ती सर्व इमारत बँकेनें पूर्णतः खरेदी केली आहे. कांहीं तांत्रिक अडचणींचें निराकरण होऊन लवकरच करवीरनिवासिनी श्रीमहालक्ष्मीचे सन्निध आपल्या बँकेची सुसज्ज इमारत बांधली जाईल, असा आम्हांस भरवंसा वाटतो."

### संस्थेची स्थापना

शिक्षणसंस्थाप्रमाणें आपापल्या ज्ञातिबांधवांच्या हितासाठी, व आर्थिक हितसंवर्धनासाठी जातीजमातींच्या पतपेढ्या चालविणें ही गोष्ट त्या वेळीं शिष्टसंमत म्हणून मानली जात असे, आणि त्याच तत्त्वावर सन १९३३ सालीं कोल्हापूर संस्थानांतील ब्राह्मणसमाजाच्या आर्थिक साहाय्यासाठी व नैमित्तिक हितसंवर्धनासाठी केवळ ब्राह्मण समाजाची पतपेढी असणें जरूरीचें व क्रमप्राप्त भासूं लागल्यानें त्या वेळच्या कांहीं पुढारी मंडळींशीं श्री. उमराणीकर वैद्य, श्री. आप्पासाहेब महेकर, यांनीं विचारविनिमय करून प्रसंगीं अनेक बैठका घेऊन श्रीमहालक्ष्मी देवालयाचे समीप "श्रीमहालक्ष्मी को-ऑप. सोसायटी लिमिटेड" या नांवाची संस्था स्थापन करण्याचा संकल्प केला.

संस्था नोंदवितांना नियोजित भांडवल, १०,००० (दहा हजार) रुपये पांच रुपयांच्या दोन हजार भागांत विभागलेलें होतें व कर्जमर्यादा रु. पांचशेची होती आणि कर्जाच्या व्याजाचा दर नऊ रुपये सहा आणे होता. म्हणजे अगदीं लहान प्रमाणांत ही सुरुवात होती. संस्थेची पहिली साधारण सभा दि. १०-११-१९३३ रोजीं राजवैद्य यशवंतरावजी गुणे यांच्या दवाखान्यांत कोल्हापूर संस्थानचे माजी दिवाण सर रघुनाथराव सबनीस यांच्या अध्यक्षतेखालीं भरून संस्थेच्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली.

### प्रमुख कार्यकर्ते

त्या दिवशीं संस्थेच्या सभासदपटावर ६५ सदस्यांची नोंद होऊन संस्थेचें दैनंदिन कामकाज चालू करण्यांत आलें. सोसायटीच्या दैनंदिन कार्याची व प्रगतीची जबाबदारी वेळोवेळीं निवडून आलेल्या सदस्यांनीं सद्भावनेनें आणि सहकार्याच्या खऱ्या जाणिवेनें आजपर्यंत उचललेली आहे. त्या सर्वांचा अभिमान सभासदमित्रांना वाटावा अशीच त्यांची कामगिरी आहे यांत प्रत्यवाय नाहीं. प्रामुख्यानें उल्लेखनीय म्हणून नमूद करणें युक्त ते हें कीं, संस्थेचे पहिले अध्यक्ष कै. श्री. विनायकराव महेकर सजानीस श्री. उमराणीकर वैद्य, प्रथम ऑनररी सेक्रेटरी पुढें ऑडिटर म्हणून काम केलेले श्री. श्रीपाद शिवाजी देशपांडे, आणि नंतरचे ऑनररी सेक्रेटरी श्री. ना. गो. मुनीश्वर यांनीं पांच वर्षे निष्ठेनें, नेकीनें व आत्मीयतेनें, संस्थेच्या कामकाजाला जें वळण दिलें त्याचा उपयोग नंतर आलेल्या पदाधिकाऱ्यांना प्रत्यहि झाला. त्याचप्रमाणें नंतर मॅनेजर म्हणून नेमणूक झालेले श्री. ना. गो. मुनीश्वर यांच्या कर्तृत्वाचा लाभ संस्थेला होऊन आजच्या भरभराटीच्या व स्थैर्याच्या स्थितीला त्यांचेहि श्रम

कारणीभूत झालेले आहेत. श्री. मुनीश्वर हे नुकतेंच आपल्या खाजगी कार्यासाठी सेवानिवृत्त झाले. त्यांची उणीव बऱ्याच काळपर्यंत जाणवत राहील यांत शंका नाहीं.

### संस्थेची प्रगति

संस्थेच्या प्रारंभिक कार्याची मर्यादा केवळ समासदांच्या किरकोळ गरजा निभावण्यासाठी व्यक्तिगत जामीनकीवर व स्थावरावर लहान लहान रकमा कर्जाऊ देण्याची होती. सन १९४४ सालीं चेक व हुंड्या यांचा व्यवहार करणें युक्त वाटूं लागल्यानें, या सोसायटीचें रूपांतर 'को-ऑप. बँक' असें करण्यांत येऊन बँकिंगचे सर्व व्यवहार करण्यास सुरुवात झाली. आज महोत्सवसालीं, शेअर भांडवल १·४ लाख असून ठेवी १४ लाख, ६२ हजारांच्या आहेत. सर्व प्रकारचें कर्ज १३ लाख, ८० हजारांचें असून ठेवींचें खेळत्या भांडवलाशीं प्रमाण ८८ ते ८० कायम ठेवण्यांत आलें आहे ही गोष्ट स्पृहणीयच म्हणतां येईल. पांच वर्षांपूर्वी मेंबर, नॉन मेंबर यांच्या ठेवींचें प्रमाण ३:१ होतें. तें या रौप्यमहोत्सववर्षी ८:९ असें व्हावें यावरून संस्थेचा बोज कोल्हापुरांतील सर्वसाधारण जनतेंत किती आहे याची सत्यताच पटवीत आहे. त्याचप्रमाणें प्रथमतः ५०० रुपयांच्या कर्जाची मर्यादा हळूं हळूं वाढवून ती आज १०,००० पर्यंत नेऊन ठेवून समासदांना अनेक मार्गांनीं स्वतःची उन्नति करून घेण्याचा मार्ग बँकेनें खुला करून दिला आहे.

### जळिताच्या आघातांतून पुनः उन्नतीकडे

संस्थेची प्रगति अशीच चालू राहती तर आजच्यापेक्षांहि संस्थेच्या कार्याला स्पृहणीय महत्त्व आलें असतें. परंतु दुर्दैवानें १९४८ च्या महात्मा गांधींच्या वधोत्तर वावटळींत कोल्हापुरांतील ब्राह्मण समाजावर जाळपोळ व दंगलीच्या प्रकारानें जो प्रहार झाला त्याची झळ या संस्थेलाहि प्रत्यक्षपणें लागून संस्थेचे कागदपत्र व फर्निचर जळाल्यामुळें फार नुकसान झालें. शिवाय अप्रत्यक्षपणें तो आघात समाजाच्या व पर्यायानें बँकेच्या स्थैर्यावरहि झाला. एक क्षण असा होता कीं, समासदांची आर्थिक सुरक्षितता कोसळून या बँकेशीं संबंधित असलेलीं अनेक कुटुंबें धुळीला मिळतात कीं काय असा संभ्रम उत्पन्न झाला. पण त्याहि स्थितींत त्या वेळच्या संस्थेच्या कार्यकारी मंडळानें व प्रामुख्यानें अध्यक्ष श्री. दा. श्री. मुनीश्वर, मॅनेजर श्री. ना. गो. मुनीश्वर व श्री. उमराणीकर, वैद्य व सेवक कार्यकर्त्यांनीं आदि वर्गानेंहि व्यक्तिगत प्रतिष्ठा पणाला लावून भगीरथ प्रयत्न केले, संदर्भ कागदपत्रांच्या जळीतामुळें रुजुरुजुवात होऊन नवीन कागदपत्रांची ठेव, कर्जाची संगतवारी लावण्याचें कष्टाचें व जिकीरीचें काम सर्व संबंधितांनीं आस्थेवाईकपणें केलें; व त्यासाठी १॥ महिन्यापर्यंत संस्थेचा दैनंदिन व्यवहार बंद ठेवावा लागला. अखिल महाराष्ट्रांत महात्मा गांधींच्या वधोत्तर दंगलींत बँकेवर असा—आपल्याच बँकेवर—आघात झाला पण त्यांतूनहि संस्था निर्विघ्नपणें जगदंबेच्या कृपेनें पार पडली.

एरव्हीं अशा प्रसंगीं ठेवीदारांनीं बँकेच्या स्थैर्याबद्दल चुकीची कल्पना करून घेऊन ठेवींसाठी अनास्थेचा प्रसंग आणला असता, पण आपल्या संस्थेच्या संचालकांवर त्यांचा इतका दृढ विश्वास कीं केवळ तोंडी आश्वासनावर सर्वांनीं धीर धरला आणि सर्व गोष्टी युक्त त्या मार्गानें कार्यवाहीत आणण्यास एक प्रकारें मदतच केली. या त्यांच्या सुज्ञपणाबद्दल बँक आणि पर्यायानें सर्व समासदमित्र, ठेवीदारांचे सदैव ऋणीच राहतील यांत शंका नाहीं.

### बँक सर्व जमातींना खुली

भारतीय विधान सभेच्या आदेशाप्रमाणें व जागतिक परिस्थितीच्या अनुषंगानें, केवळ ब्राह्मण समाजासाठी असलेली बँक सर्व जाती-जमातींना खुली करून प्रगतिपर सामाजिक कार्याला प्रथम सुरुवात केली आणि या गोष्टीचा फायदा कोल्हापुरांतील इतर जमातींच्या लोकांनींहि समासद होऊन घेण्यास सुरुवात केली आहे.

संस्थेच्या पदाधिकाऱ्यांप्रमाणें अनेक समासदमित्रांनीं समासदनियुक्त ऑडिटर म्हणून आपल्या ज्ञानाचा लाभ संस्थेला विनामूल्य करून दिला आहे.

ही संस्था प्रामुख्यानें मध्यमवर्गीय लोकांची असल्यानें सरकारच्या कुळकायद्याचा ताण प्रामुख्यानें आपल्या समासदांच्या कर्जफेडीच्या कुवतीवर पडणें क्रमप्राप्त झाल्यामुळें थकबाकीचें प्रमाण वाढणें अपरिहार्य झालें. तरीसुद्धां पदाधिकाऱ्यांनीं काल व व्यक्ती यांचें तारतम्य ठेऊन, बँकेच्या स्थैर्याला बाध येणार नाहीं, अशा प्रकारच्या कार्यपद्धतीनें, थकबाकीदारांना कार्यप्रवण करण्यास प्रवृत्त केलें आहे. याची जाणीव ठेवून संबंधितांनीं आपल्या व्यापाला योग्य तो आवर घालून, आपली उन्नत्ति करून घ्यावी, हें सुचविणें या वेळीं युक्तच होईल.

---

**राजवाड्याची देणगी** — सौराष्ट्रामधील ध्रांगध्रा संस्थानच्या महाराजांनीं आपला ६ लाख रुपये किंमतीचा एक राजवाडा मुंबई सरकारला देणगी म्हणून दिला आहे. त्याचा उपयोग सरकारनें सार्वजनिक कामासाठी करावयाचा आहे. ह्यापूर्वी इतर कांहीं संस्थानिकांकडून मिळालेल्या राजवाड्यांत हल्लीं शिक्षण-संस्था चालू आहेत.

**भारी यंत्रसामुग्रीचा कारखाना** — रांची येथें काढण्यांत यावयाच्या भारी यंत्रसामुग्रीच्या निर्मितीच्या कारखान्याचा अहवाल रशिअन तज्ज्ञांनीं सादर केला आहे. पोलादासारख्या भारी कारखान्यांना लागणारी यंत्रसामुग्री ह्या कारखान्यांत तयार करण्यांत येणार आहे. कारखाना चालू झाल्यावर दरसाल ४५००० टन वजनाची यंत्रसामुग्री तयार होईल.

**भडोच जिल्ह्यांत तेलाचा शोध** — भडोच जिल्ह्यांतील अंकलेश्वर तालुक्यांतील तीन गांवांजवळ तेलाच्या विहीरी खोदण्याचें काम लवकरच सुरू होणार आहे. ह्या कामासाठी रुमेनिआनें पुरविलेली यंत्रसामुग्री अंकलेश्वर येथें येऊन पडली आहे. यंत्रें उभारण्याचें काम रशिअन तंत्रज्ञांच्या देखरेखीखालीं भारतीय एंजिनिअरांकडून करवून घेण्यांत येणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### अणुबाँबचें युद्ध झालें तर होणारा विनाश

अमेरिकेवर अणुबाँबच्या साह्यानें हल्ला करण्यांत आला तर काय भयानक परिस्थिति उद्भवेल ह्याची कल्पना अमेरिकन काँग्रेसच्या कमिटीपुढें देण्यांत येत असलेल्या साक्षींवरून स्पष्टपणें येते. ह्या कमिटीपुढें लष्करी तज्ज्ञ, नागरी संरक्षणाशीं संबंधित असलेले अधिकारी आणि घातक किरणोत्सर्गाबद्दलचे तज्ज्ञ ह्यांनीं आपआपली माहिती सादर केली आहे. ह्या सर्वांच्या माहितीचा निष्कर्ष असा आहे कीं, अमेरिकेवर जर एकदम केंद्रित अशा प्रकारचा हल्ला झाला तर एकूण लोकसंख्येच्या २८ टक्के म्हणजे सुमारें ४·९ कोटी लोक पहिल्या तडाख्याला प्राणाला मुकतील, सुमारें २ कोटी लोकांना भयंकर स्वरूपाच्या दुखापती होतील, आणि ह्या प्रळयांतून जे वाचतील त्यांना भयानक भौतिक परिस्थितीशीं केवळ जगण्याकरतां झगडावें लागेल. कारण, युद्धानंतर त्यांना सर्व भूमि किरणोत्सारी झालेली आढळेल. जंगलें प्रचंड वणव्यानें जळून गेलेलीं दिसतील. पुरानें धुपून गेलेली जमीन शेतीसाठी निरुपयोगी झालेली दिसेल. हा सर्व हाहाःकार अमेरिकेपुरताच मर्यादित राहील असें नाहीं. जोराच्या सोसाट्याच्या वाऱ्यामुळें किरणोत्सारी धूळ दुसऱ्या देशांवरहि पडल्याशिवाय राहणार नाहीं. अमेरिकेंतील ७० प्रमुख शहरें व १५४ लष्करी केंद्रें जर २६३ हैड्रोजन बाँम्बसनीं एकाएकीं उध्वस्त करण्यांत आलीं तर काय होईल ह्याचें हें चित्र आहे. नागरी संरक्षण अधिकाऱ्यांच्या मतानें किरणोत्सारी धुळीपासून संरक्षण करण्यासाठी साधीं भूमिगत भुयारें कार्यक्षम ठरतील. अर्थात् हें संरक्षण स्फोटाच्या प्रत्यक्ष परिसराच्या बाहेर असलें पाहिजे. अशा भुयारांमुळें १·२ कोटी लोकांचा मृत्यूपासून व तितक्याच लोकांचा जखमांपासून बचाव होऊं शकेल.

---

### रशिआचें न्यूयॉर्कमधील भव्य प्रदर्शन

गेल्या महिन्याच्या २९ तारखेला न्यूयॉर्क येथें रशिआच्या एका भव्य प्रदर्शनाचें उद्घाटन झालें. १९३९ सालीं न्यूयॉर्क येथें भरलेल्या जागतिक प्रदर्शनानंतर एवढें मोठें प्रदर्शन प्रथमच भरत आहे. रशिआची शास्त्रीय व तांत्रिक प्रगति व संस्कृति ह्यांचें सम्यक् दर्शन घडविण्याच्या हेतूनें तें भरविण्यांत आलें आहे. प्रदर्शन ४० दिवस खुलें राहणार आहे. गेल्या वर्षी रशिआ व अमेरिका ह्यांच्यांत झालेल्या कराराप्रमाणें हें प्रदर्शन खोलण्यांत आलें असून अशाच प्रकारचें अमेरिकेचें प्रदर्शन राशिआंत २५ जुलैपासून सुरू होईल. उभयतां देशांतील देवाणघेवाण वाढवून परस्परांत अधिक स्नेह निर्माण करण्याच्या प्रयत्नांचा हा परिपाक आहे. रशिआच्या प्रदर्शनांत शांततेवर अधिक देण्यांत आला आहे. प्रदर्शनांतील वस्तूंत उपग्रहाचा नमुना ठेवण्यांत आला आहे. पण खंडांतर्गत उड्डाण करणाऱ्या अग्निबाणाचा नमुना नाहीं. रशिआच्या अद्यावत् विमानाचें एक मॉडेलहि ठेवण्यांत आलें आहे. ह्या विमानानें अमेरिकन लोकहि थक्क झाले आहेत. टी. यू. १४४ हें त्याचें नांव. जगांत प्रवाशांची वाहतुक करणारें तें सर्वांत मोठें विमान आहे. २२० प्रवाशांची सोय असणाऱ्या ह्या विमानानें मॉस्को ते न्यूयॉर्क हा प्रवास कोठेंहि न थांबतां ११ तासांत पुरा केला. त्याचा दरवाजा इतक्या उंचीवर होता कीं विमानांतून उतरण्यासाठी उपयोगांत असणारा नेहमींचा सरकता जिना अपुरा पडला. त्याच्याहि वर एका लाकडी शिडीची योजना करावी लागली. प्रदर्शनाची तयारी करण्याच्या कामीं रशिअन लोकांनीं कसून मेहनत केलेली आहे. रशिआ व अमेरिका ह्यांच्यांतील राजकीय संबंध युद्धोत्तर काळांत चांगले राहिले नाहींत. पण, अशा प्रकारच्या उपक्रमांनीं परस्परांत अधिक समजुतीचें वातावरण निर्माण झालें तर जगाच्या दृष्टीनें तें स्वागतार्ह होईल.

---

### यशस्वी कर्जउभारणी

३½% १९६९ च्या व ४% १९७९ च्या कर्जरोख्यांना मिळून एकूण १८८·८४ कोटी रु. ची मागणी आली; सरकारला १७५ कोटी रु. हवे होते. अशा रीतीनें सरकारची कर्जउभारणी यशस्वी झाली. कन्व्हर्शनच्या रूपानें ८९·३८ कोटी रु. आले; रोखीनें नवे ९४·४६ कोटी रु. मिळाले. रिझर्व्ह बँकेनें कर्जरोखे घेण्यास बराच हातभार लावलेला असावा. रिझर्व्ह बँकेच्या व शेड्यूल्ड बँकांच्या येत्या आठवड्याच्या आंकड्यांवरून खरी परिस्थिति लक्षांत येईल.

---

### सारस्वत को. बँक लि.

सारस्वत को. बँकेनें जून, १९५९ अखेर संपलेल्या वर्षी आणखी प्रगति केली आहे. ठेवी २ कोटी रुपयांच्यावर जाऊन खेळतें भांडवल २·२४ कोटी रुपये झालें आहे. नेहेमींच्या आवश्यक तरतुदी करून बँकेस १,०३,२७२ रु. नफा झाला आहे. भागदारांना ६¼% डिव्हिडंड मिळणार आहे.

---

### सांगली बँक लि. ला असिस्टंट मॅनेजर हवा

सांगली बँक लि. नें असिस्टंट मॅनेजरच्या जागेसाठीं अर्ज मागविले आहेत. जागेचा पगार रु. ३५०–२५–७०० असा आहे. अर्जदार कॉमर्स किंवा अर्थशास्त्र विषय घेऊन पदवीपरीक्षा किमान दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झालेला असावा. त्याखेरीज, कायद्याची पदवी असणारास प्राधान्य मिळूं शकेल. किमान पांच वर्षांचा बँकेमधील अधिकारी म्हणून अनुभव पाहिजे. वय ४० वर्षांपेक्षा जास्त नसावें. १५ जुलै, १९५९ पूर्वी अर्ज करावयाचे आहेत.

---

### भारताच्या कर्जफेडीचा पाकिस्तानी बजेटांत उल्लेख नाहीं

पाकिस्तानच्या अर्थमंत्र्यांनीं सादर केलेल्या अंदाजपत्रकांत भारताच्या कर्जफेडीचा कोठेंहि उल्लेख नाहीं. ह्यापूर्वीच्या अंदाजपत्रकांत थोडीतरी तरतूद केलेली असायची; प्रत्यक्ष रक्कम पाकिस्ताननें कधींच दिली नाहीं, ही गोष्ट वेगळी. वास्तविक, फाळणीच्या वेळचे ३०० कोटी रुपये पाकिस्ताननें भारताला दिले पाहिजेत.

---

### पाकिस्तानचा ५६% खर्च लष्करी खात्यावर

पाकिस्तान सरकारच्या १९५९–६० च्या अंदाजपत्रकांत १५४·०८ कोटी रु. उत्पन्न गृहीत धरलें असून १५१·४५ कोटी रु. खर्च अपेक्षित आहे. म्हणजे २·६३ कोटी रुपयांचा वाढावा उरेल. खर्चापैकी ८६ कोटी रुपये (५६%) लष्करी खात्यावर खर्च होतील.

---

### चरख्याचें कोणतेंच मॉडेल १ लक्ष रु. बक्षिसास पात्र नाहीं

ऑल इंडिया खादी अँड व्हिलेज इंडस्ट्रीज बोर्डानें फेब्रुवारी, १९५७ मध्यें, सर्वोत्कृष्ट सुधारलेला चरखा बनविणाऱ्याला एक लक्ष रुपयांचें बक्षीस देण्याचें जाहीर केलें होतें. बक्षिसाला लायक ठरण्याच्या अटी एकाहि चरख्याच्या मॉडेलला पार पाडतां आल्या नाहींत; त्यामुळें कोणालाच बक्षीस दिलें जाणार नाहीं.

### बरौनी येथील तेल शुद्ध करण्याचा कारखाना

भारत सरकारनें बरौनी येथें तेल शुद्ध करण्याचा कारखाना रशिआच्या मदतीनें काढण्याचें ठरविलें आहे. कारखान्याची जागा नक्की करण्यासाठी रशिअन तंत्रज्ञ लवकरच भारतांत येणार आहेत कारखान्याविषयींचा तपशीलवार अहवालहि ते सादर करणार आहेत. हा कारखाना १९६२ च्या एप्रिल महिन्यांत उत्पादनास प्रारंभ करील असा अंदाज आहे. कारखान्याची तेल शुद्ध करण्याची शक्ति दरसाल ८० लाख टनांची आहे. कारखाना चालू झाल्यावर दरसाल ४० ते ४५ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत होऊं लागेल. खंबायतच्या आखातांत आणि आसाममध्यें नव्यानें खणण्यांत येणाऱ्या विहिरींत भरपूर प्रमाणांत तेल सांपडेल असा विश्वास वाटत आहे. अर्थातच ह्या तेलाच्या शुद्धीकरणाची व्यवस्था असणें अवश्य आहे. देशांतील खनिज तेलाची मागणी एकसारखी वाढत चालली आहे. सध्या दरसाल ५० लाख टन तेल खपत आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस तेलाची मागणी ७० लाख टनांपर्यंत जाईल असा अंदाज आहे. भारताच्या खाणी व खनिज तेलखात्यानें केलेल्या अंदाजाप्रमाणें १९६५ सालच्या सुमारास तेलाची मागणी आणखी ४० ते ५० लाख टनांनीं वाढेल. भारताच्या अर्थव्यवस्थेंत खनिज तेलाचें अपुरें उत्पादन हा एक कच्चा दुवा असल्यानें त्या बाबतींत स्वयंपूर्ण होण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. म्हणूनच बरौनी येथील तेलशुद्धीचा कारखाना ठरविलेल्या वेळापत्रकाप्रमाणें चालू करण्याची कोशीस सरकार करीत आहे. रशिआचें आर्थिक व तांत्रिक साह्य असल्यामुळें हा कारखाना अपेक्षेप्रमाणें उत्पादन करूं लागण्याची बरीच शक्यता आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत तेलाच्या उत्पादनावर अधिकच भर देण्यांत येणार आहे.

---

**पाणथळ जमिनींची सुधारणा**—पंजाबमधील पाणथळ जमिनींतील पाण्याचा निचरा करून त्या लागवडीयोग्य करण्याची एक योजना राज्य सरकारनें आंखली आहे. योजना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेअखेर पुरी व्हावयाची असून तीसाठी मध्यवर्ती सरकारकडे १ कोटी रुपयांचें कर्ज मागण्यांत आलें आहे. सर्व योजनेसाठी ११ कोटी रुपये लागतील. त्यांपैकी १० कोटी रु. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत लागतील.

**बर्नार्ड शॉ ह्यांच्या नाटकाचा चित्रपट**—बर्नार्ड शॉ ह्यांच्या 'आर्मस अँड दि मॅन' ह्या नाटकावर आधारलेल्या बोलपटाला पश्चिम जर्मन सरकारचें पहिलें बक्षीस मिळालें आहे. ह्या नाटकांत लष्करांत भरती झालेल्या एका सैनिकाचा युद्धाला असणारा प्रामाणिक विरोध चित्रित करण्यांत आला आहे. नाटकावरील बोलपटाच्या निर्मात्यालाहि १॥ लाख मार्कस देण्यांत आले.

**कर्जाच्या वाटाघाटी सुरू**—सोव्हिएट रशिआ आणि युगोस्लाव्हिआ ह्यांच्यांत कर्जाच्या वाटाघाटी पुन्हां सुरू झाल्या आहेत. १९५६ सालीं रशिआनें युगोस्लाव्हिआला १० कोटी रुबलसचें कर्ज देण्याची तयारी दाखविली होती. पण पुढें राजकीय मतभेदामुळें कर्जाच्या वाटाघाटी स्थगित करण्यांत आल्या होत्या वाटाघाटी बंद झाल्यामुळें युगोस्लाव्हिआला अमेरिकेची मदत घ्यावी लागली होती.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत मांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें मांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल मांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ९१,००० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी
श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, प्रासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा
(४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक)
(६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत मांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें मांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल मांडवल | रु. ४,००,१८५ |
| रिझर्व्हज् | रु. १,२५,००० |
| एकूण खेळतें मांडवल | रु. ७७,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.